म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र.

१८२१

REFBK-0001979
REFBK-0001979

# सुखस्वप्न.

( प्रो. वामन मल्हार जोशी एम्. ए. यांच्या
मार्मिक प्रस्तावनेसह. )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
ग्रं. क्र. ९८५८

लेखक

श्रीराम गोविंद बेडेकर.

REFBK-0001979
REFBK-0001979

शके १८४३.

किंमत सहा आणे.

Printer:—Sitaram Vithal Sawant-Tirodker, Sadguru Printing Press, C. 554 Girgaum Bombay.

Publisher:—Shriram Govind Bedeker, Puranik Wadi, Dadar, Bombay.

# प्रस्तावना.

माझे मित्र रा. रा. श्रीराम गोविंद बेडेकर यांनीं आपल्या ' सुखस्वप्न ' नामक लघु काव्याला प्रस्तावना लिहिण्याचें काम जें मजवरच सोंपविलें आहे तें मजवरच कां म्हणून सोंपविलें, प्रस्तावना लिहवून घेण्यापासून फायदा तरी कोणता इत्यादि प्रश्नांचा फार खल करीत बसण्यांत अर्थ नाहीं. फुलाला ज्याप्रमाणें देंठ, किंवा तलवारीला मूठ, त्याप्रमाणेंच पुस्तकाला प्रस्तावना ही पाहिजेच असा हल्लींचा काळ दिसतो आहे, आणि बऱ्याच बाबतींत काळाच्या प्रवाहा-बरोबर वाहवत जाणाराच मी असल्यामुळें हें ' प्रवाहपतित ' काम कर-ण्याचें मीं कबूल केलें आहे. या प्रस्तावनेंत काव्यात्मक ' सुखस्वप्नाचें कथानक गद्य सारांश रूपानें सांगणें अनुचित होय. बरें, या सुखस्वप्नाची माधुरी वर्णन करावी तर तेंहि अनुचितच; कारण काव्याची काय किंवा दुसऱ्या कोणत्याहि मूर्तस्वरूप धारण केलेल्या सौंदर्याची काय, चर्चा करण्या-पेक्षां किंवा त्याचें पृथक्करण करण्यापेक्षां त्याचा आस्वाद घेणें किंवा आस्वाद घेण्याची सुसंधि लोकांना आणून देणें किंवा निदान त्याचा आस्वाद घेण्याच्या आड तरी न येणें हेंच केव्हांहि श्रेयस्कर, आणि म्हणूनच आपलें प्रस्तावनेचें घोडें उगाच पुढें दामटून ' सुखस्वप्नाच्या सुरम्य उद्यानांत जाऊं पाहणाऱ्यांना बिचकावण्याचें पाप मी घेऊं इच्छीत नाहीं.

या लघु काव्यास पुणें येथील डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रॅन्स्लेशन सोसा-यटीनें व इंदूर येथील ग्रंथोत्तेजक मंडळानें बक्षीस देऊं केलें आहे हें सांगितलें म्हणजे याची आणखी स्तुति करून त्याकडे लोकांचें लक्ष्य वेध-ण्याचा प्रयत्न करण्याची फारशी जरूरी राहत नाहीं. तथापि एक दोन गोष्टींचा येथें उल्लेख करण्यास हरकत नाहीं.

पहिली गोष्ट म्हणजे ही कीं, कांहीं आधुनिक कवींप्रमाणें रा. बेडेकर यांना अद्यापि ' प्रेमाचें वेड लागलेलें नाहीं किंवा ' वेडा ' चेंहि प्रेम त्यांच्या काव्यांत

अद्यापि दृग्गोचर होऊं लागलेलें नाहीं. रा. बेडेकर हे, माझ्या माहितीप्रमाणें तरी अद्यापि कधींहि न पाहिलेल्या ‘ बुलबुलास ’ किंवा ‘ चंडोलाप्रत ’ तारस्वरानें हांका मारूं लागले नाहींत. उसनी ऐट आणून त्यांनीं ‘रण-शिंग ’ फुंकल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. तसेंच ‘ तीस ’ किंवा नुसत्या “......स ” उद्देशून त्यांच्या काव्यपत्रिका अद्यापि जाऊं लागल्या नाहींत. निदान त्या ते चवाठ्यावर तरी आणीत नाहींत. अद्यापपावेतों तरी त्यांची काव्यशक्ति आपल्या आवांक्याबाहेर आकाशांत भराऱ्या मारूं लागलेली नाहीं. ती सामान्यजनपरिचित अशा स्नेहाच्या व सात्विक भावनांच्या क्षेत्रांतच अद्यापि क्रीडा करीत आहे. ‘ दिव्यत्व, ’ असामान्यत्व, अपरिचितत्व यांमध्येंच रमणीयता किंवा मनोहारित्व असतें असें नाहीं, तर तें सामान्य, परिचित, पार्थिव वस्तूंमध्यें, प्रसंगांमध्यें, संबंधांमध्येंहि असूं शकतें असें त्यांच्या काव्यशक्तीस वाटत असावें असें दिसतें. नेहमींच्या परिचयाच्याच गोष्टी, पण त्या काव्यप्रतिभेस कशा नवीन व सुंदर भासतात, इतकेंच नव्हे तर त्यांचें नावीन्य व सौंदर्य इतरांनाहि प्रतीत करण्याचें सामर्थ्य त्या प्रतिभेमध्यें कसें असतें, हें रा. बेडेकर यांच्या प्रस्तुत लघु काव्यावरून कांहीं अंशानें तरी दिसून येईल. लहान मुलामुलींचे खेळ व त्यांची अल्पकालीन् एकीबेकी, मित्रामित्रांचा विनोद, मुलींचें पित्यावरील प्रेम, श्रीमंत ह्यातार्‍यांची कलिकातुल्य कुमारींशीं विवाह करण्याची इच्छा, या व अशाच गोष्टींत असामान्यत्व कांहीं नसलें तरी त्यांत काव्यबीजें भरलेलीं आहेत, यांच्या काव्यात्मक वर्णनानें सात्विक विचारांचें व वृत्तींचें रम्यत्व व श्रेयस्करत्व, तसेंच तामसी विचारांचें आणि वृत्तींचें निंद्यत्व व भीषणत्व हीं लोकांच्या मनांत बिंबवितां येण्यासारखीं आहेत. आणि असें काम रा. बेडेकर यांना करतां येईल असें हें लघु काव्य वाचून माझें मत झालें आहे. व इतरांचेंहि होईल अशी आशा आहे.

हिंगणें,
२७ मे १९२१ } वामन मल्हार जोशी.

श्री.

# लेखकाचे दोन शब्द.

प्रस्तुत काव्याची रसिकांस ओळख करून देण्याचें कार्य माझ्या विनंतीस मान देऊन एका विद्वान् गृहस्थांनीं आधींच केलें आहे. काव्याच्या रचनेच्या व प्रकाशनाच्या कामीं ज्यांनीं मला साह्य केलें त्यांचे आभार मानण्याचें गोड काम हातीं घेण्यापूर्वी, एका गोष्टीचा थोडासा निर्देश करण्याची वाचकांची परवानगी घेतों.

ललित वाङ्मयाच्या नाटकादि इतर अंगांप्रमाणें काव्याचाही उद्देश उच्च प्रकारचें मनोरंजन करणें हाच असतो. सत्यशोधन हें उद्दिष्ट तत्वज्ञानाचें असतें. तथापि, सौंदर्य हा कलेचा जीव कीं प्राण असल्यामुळें व वैचित्र्य हें सौंदर्याचें उगमस्थान असल्यामुळें, विविध वेषांनीं प्रतीत होणाऱ्या सत्याचें (सौंदर्यपोषणेच्छ दृष्टीनें) काव्यांतहि आविष्करण होतें. मनोरंजन हें कलेचें मुख्य उद्दिष्ट, आणि तत्वबोध हें तें उद्दिष्ट साधण्याचें अनेकांतलें एक साधन असतें. परम पदवीस पोंचलेल्या निर्मळ बंधुभगिनी–प्रेमाच्या द्वारा तें उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रस्तुत काव्यांत प्रयत्न केलेला आहे.

उच्च दर्ज्याची व विविध प्रकारची शारदोपासना करून आणि होतकरू लेखकांस अंतःकरणपूर्वक मार्गदर्शक होऊन महाराष्ट्र साहित्याच्या आचार्य पदवीस पोंचलेले रसिक विद्वद्वर श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या नांवाचा मला प्रथम साभार उल्लेख केला पाहिजे. प्रकृतिस्वास्थ्य, मनःस्वास्थ्य व पूर्व परिचय या तिन्हीं गोष्टींचा अभाव असतांहि या काव्याचें त्याच्या निरनिराळ्या दोन अवस्थांत त्यांनीं श्लोकशः परीक्षण केलें. या कृतीबद्दल आपला अनुकूल अभिप्राय व्यक्त करून त्यांनीं अनेक बहुमोल सूचना केल्या. त्यांबद्दल मी त्यांचा अंतःकरणपूर्वक ऋणी आहें.

उज्ज्वल प्रतिभेनें व रसिक तत्वकुतूहलानें महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांस प्रिय झालेल्या रागिणींचे जनक प्रो. वामन मल्हार जोशी यांनींहि पूर्वीची ओळख नसतां हें काव्य दोन तीन वेळां आस्थेनें वाचून पाहिलें. प्रस्तुत काव्याचा विस्तार हें त्यांच्या सहृदयतेच्या सूचनांचें फल आहे. ' सुख स्वप्नास ' प्रस्तावना लिहून, किंवा त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें तर, सुखस्वप्नाच्या तरवारीला आपल्या प्रस्तावनेची सुबक मूठ बसवून तिला मजबुती आणि सौंदर्य आणून, प्रो. जोशी यांनीं आपला ऋणानुबंध अधिक दृढ केला याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानितों.

डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी, पुणें, आणि महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळ, इंदूर, या विद्वत्सभांनीं या काव्याबद्दल अनुकूल मत प्रदर्शित करून त्यास पारितोषिकपात्र ठरविलें, याबद्दल मी त्या संस्थांच्या विद्वान् परीक्षकांचा व सदस्यांचा फार आभारी आहें.

सद्गुरुप्रेसचे मालक माझे मित्र रा. रा. बापू बळवंत देवधर यांनीं ठरलेल्या मुदतींत काव्य इतक्या सुबक रीतीनें छापून दिलें, व मुद्रितें तपासण्याच्या कामांत मला मदत केली याबद्दल त्यांचे आभार मानून वाचकांची रजा घेतों.

पुराणिकांचीवाडी दादर, मुंबई,<br>आषाढ शु. ११ श. १८४३

श्रीराम गोविंद बेडेकर.

ताई,

आठवणी किति आल्या !

तुझ्या एकल्या मूर्तिसभोंतीं त्या आंदोलित झाल्या ! ॥ धृ० ॥
एक एक त्या अनेक रूपें अनंत वेषां ल्याल्या !
सांठवणीच्या जळिं सिंधूच्या प्रचंड लाटा न्हाल्या !
अदृश्य एका कुसुमें दाही दिशा सुगंधित केल्या !
रवि मावळला ! तत्किरणांच्या गगनीं तारा झाल्या !

आठवणी किति आल्या !

विनय.

# सुख-स्वप्न.

वृत्तः हरिणी.

प्रथम प्रसंग.

## स्वदेशागमन.

१२८१

सदन ह्मणती जें विद्येचें, कलाप्रणयस्थल,
गृहिं रुचति ज्या स्वातंत्र्याला विहार अशृंखल,
प्रगतिशिखरा गेलीं शास्त्रें, तयांसह संस्कृती,
हरिखुनि जिथें आर्यांच्याही सुखें रमती श्रुती, १

नशिब भिउनी उद्योगाला दिवंगत जाहलें,
अढळ ठरलीं लक्ष्मीचींही सुचंचल पावलें,
मिरवि सगळ्या पृथ्वीच्या जें गुरुत्वपदाप्रत,
यश मिळविलें *पातालीं त्या 'सुविद्य'. पदांकित. २

किरण जिथुनी ज्ञानार्काचे जगावरि फांकले,
वळण पहिलें सौंदर्याचें कलेस जयें दिलें,
परवशपणा यावा का हा अशा तुज भारता !
भ्रमति जगतीं कीं विद्यार्थी तुझे सुत हिंडतां ! ३

मग परतलों षड्वर्षांतीं स्वभूमिस यावया,
बघत पथिंच्या विद्यापीठां, पुरांस, नृपालयां;

---

* अमेरिकेंत.

करित फिरतां देशोदेशीं नवानुभवार्जना
भिवविति मला *शार्मण्यांच्या न त्या रणगर्जना. ४

गलबत बुडे भूमध्याब्धीमधीं मम वादळीं,
अशरण पडें मी तुर्कांच्या बचावुनी नौदळीं:
यवनपति हो *शार्मण्यांचा सखा समरक्रमीं:
अडकुनि पडें तुर्कस्थानीं तदा हतबुद्ध मी. ५

सधन रसिक स्नेही तेथें अमीर मिळे कुणी,
मज निजगृहीं ठेवी प्रेमें, न वस्तु मला उणी:
तरि न करमे, ये कंटाळा, न शांति मना मिळे,
कुठुनिहि मला आप्तेष्टांचें न वृत्त तिथें कळे. ६

स्थितित असल्या कष्टें संवत्सरद्वय काढुनी,
समरकुतुकें तुर्की सेनेसवें रणि जाउनी
लढत मिसर प्रांतीं आलों, तिथें बहु शोधितां
प्रथमचि दिसे नौका आलों तिनें मग भारता. ७

उदधि-लहरीवस्त्राच्या त्या निळ्या पदरांतुनी
सरकवित नौहस्तांला घे हृदीं मज ओढुनी
प्रिय भरतभूकन्या मुंबा, तिला झणिं ओळखीं,
विरहविकला मातें केलें तिनें निमिषीं सुखी. ८

गहिंवरुनि मी हिंदश्रीचीं पदें नमिं पावन,
हृदय भरुनी आलें होतां तिचें प्रिय दर्शन:
असु अधन वा कष्टी, कांहीं असो तुजला उणें,
तवचि रुचतें अंकीं माते, मुलांतव लोळणें! ९

---

* जर्मनांच्या

ह्मणत मनिं जों, "जावें कोणातरी पथिकाश्रमीं,"
रथ ठरविण्या आलों, ठेलों तदा दचकोनि मी,
सुपरिचितता भासे ज्याच्या मला मुखमंडलीं
दुरुनि दिसला मार्गें जातां गृहस्थ तया स्थलीं. १०

पळतचि तया हांका मारीं 'अहो,' ह्मणुनी जंव,
प्रिय मम सहाध्यायी थांबे सविस्मय माधवः
मज निरखुनी पाहे, धांवे करांस उभारुनी,
हृदयिं धरि तो जैसा लोहा अयोमणि ओढुनी. ११.

स्तिमित नयनें मातें प्रेमें पहात कुतूहलें
"मरण मुखिच्या ग्रासा ये ये" असें ह्मणुनी डुळे.
नगरिं शिरलों दोघे वेगें रथामधिं बैसुनी,
नवचि वमली वाटे मातें न मोहमयी जुनी ! १२

पथिच परकी शीर्षत्राणा तयें मम ओढिलें,
शिर नटविलें माझें देशी सुशोभित मंदिलें.
विविध करितां गोष्टी आलों सुहृद्गृहिं कीं क्षणीं:
दिसलि सदनद्वारीं मातें उभी रमणी कुणी. १३

ह्मणत "विनया, ही मत्कांता सुशील, मृदुस्वरा.
सकल गृहिणीधर्मा जाणे, तशी उचितादरा,"
परिचित तिशीं हर्षोद्गारें करी मजला पती
'विनय' इतुक्या शब्दें झाली प्रफुल्लमुखी सती. १४

तिस मधुमती दो वर्षांची मनोहर बालिका;
अमृत मधुरा वाणीनें ती सलज्ज करी पिकाः
रुचति न कुणा बालांचीं तीं द्रूंचे मृदु बोबडीं ?
रुचि विविधता अन्यां ठायीं, इथ सम आवडी. १५

बहुविध तिला केल्या प्रश्नां करी उचितोत्तरें;
वदन खुललें शंसोद्गारें अकारण हांसरें;
डुलत बसलों आम्हीं सारीं तिच्या गुणकौतुकें,
तिस न दिधला खाऊं, घेऊं तिचे उलटे मुके! १६

करि बहु सखा अतिथ्यातें, वदे मधुरा गिरा;
विविध विषयीं रंगे वाणी, विनोदहि ये भरा.
सुखद किति त्या बाल्यवस्थास्मृती हृदयंगम!
नवल न लया गेले माझे पळांत पथश्रम! १७

सदनशुचिता देई भारी प्रसन्नपणा मनाः
प्रियजनकथा देती गोडी विशेषचि भोजना
नवरसवती वाणी, आणी तिला नव माधुरी
रसिक वहिनी; त्या त्या अन्नीं सहा रस जी भरी. १८

दृढ परिचयासाठीं गोष्टी करीं वहिनीसवें,
मधुर पतिच्या बालक्रीडा, विनोद नवे नवे
परिसुनि तदा लज्जाशीला सकौतुकलोचना
हसत रसिका गालीं, प्रेमें बघे दयिताननां. १९

कुसुमित लता, आम्रा आला नवा मृदु मोहर,
उभय रमती प्रेमानंदीं निसर्गमनोहरः
सहृदय पिका तल्लीलांचा खरा नयनोत्सव,
मधुमय रवें गानें त्यांचें करी गुणगौरव! २०

करित सहजीं गोष्टींसंगें पदांकित अंगण,
अनुभवित मी तांबूलाचे त्रयोदशही गुण,
सहज पुसलें "स्नेही कोणी, दुजे गुरुबंधु वा,
वसति पुरिं या, बालत्वींचे सखे मम माधवा"? २१

" तवचि भगिनी " ऐसें कांहीं वदे अपरिस्फुट,
मनिं मम तयें वाढे वेगें कुतूहल उत्कट;
" कवण ? " पुसतां हो तद्वृत्ती अकल्पित बावरी.
" कुणिहि न, " ह्मणे, गूढोद्वेगा मनांतिल आंवरी २२
स्मित मुखिं बळें आणी, राहे न तें निमिषार्धही,
सहज सरला वृत्ती त्याची, न तो पटु निग्रहीं.
प्रथम करुनी शून्या दृष्टी मला अवलोकुनी,
मिटुनि पुसतों, "गेलें कोण स्मृतींतुनि राहुनी ?" २३
हंसुनि म्हटलें " हें झोंपाया भलें मिष हो तुला ।
घन तिमिरिं त्या कैसें कोणी पडे तत्र दृष्टिला ? "
जणुं दचकुनी जागा झाला वदे करुणेक्षण,
"स्मरसि कमला, बालत्वींची तुझी प्रिय मैत्रिण ?" २४
' कमल ' इतुकीं कानीं येतां सुधामय अक्षरें
सुखदहि तया स्नेहस्थानीं न देह पुढें ठरे;
थरथरुनि ये अंगीं कांहीं तरी नव जीवन,
स्फुरति सगळीं गात्रें हर्षें, पुरें भ्रमलें मन. २५
" गृहिं चल तिच्या जाऊं " मित्रा ह्मणे, तंव अंगणीं
लगबग तया भेटायाला महाशय ये कुणीः
"कठिणचि दशा त्या रोग्याची, चला करुनी जव ! "
सभय वदला; " आलों, " बोले भिषग्वर माधव. २६
अधिक पुसणें नाहीं झालें तिच्या विषयीं तदा,
' वय गुण कसे तत्कांताचे, ' ' कशी गृहसंपदाः '
इतुकि नव्हती शांती मित्रा, ' बघेन तिला कधीं, '
अतिशय अशा उत्कंठेनें बने मम मुग्ध धी. २७

परतुनि गृहा येईतों तो, न धीर निघे मला,
प्रबल हृदयीं उत्कंठा, दे न विश्रम पावलां:
मज वदवि ती " वाटे जावें सखीगृहिं या क्षणीं;
उरकुनि तुझीं कामें यावें तुवां हि तिथें झणीं. २८
पुसुनि सुहृदा कोठेंसें तें तिचें वसतिस्थल
शिरिं चढवुनी होता तैसा ससंभ्रम मंदिल,
पथचि धरिला; औत्सुक्यें जी पदीं स्फुरली तंव,
पवनगति ती ठेंचानींही न होय कमी लव ! २९

---

द्वितीय प्रसंग.

## शैशवसहचरी.

उठति, विरती, येती, जाती, विचारपरंपरा:
स्थिति नच परी एका जागीं कुणीहि धरी जरा;
गति बघुनि ती, विद्युन्माला, दरिद्रमनोरथ,
पवनलहरी, या सर्वांचा सुमंद गमे पथ. १
हसतमुख ती केव्हां, केव्हां अधोमुख लाजुनी,
जवळचि उभी केव्हां स्कंधीं करद्वय ठेवुनी.
कधि रुसलि कीं, ' नाहीं भेटी दिली इतुके दिन, '
सकुतुक करी मद्विद्येचें कधीं अभिनंदन. २
क्षणिच युवती होई बाला, दिसे मग शैशवीं,
कधि उपवनीं गंगातीरीं, कधीं महिलोत्सवीं;
कधि सुखवती, केव्हां दुःखी बघूनि परापदा;
कधि विनयिनी वंदी भावें शिवां तुलसीपदां. ३

कधि मृदुकरीं या हस्ताला धरूनि विनोदिनी
बघत सगळ्या रेषा टाकी भविष्यहि सांगुनी,
'किति सुत, सुताः' 'संपत्तीची समृद्धि' कशी, वदे,
'चतुर गृहिणी,' 'विद्या मोठी' कथूनि, 'चिरायु' दे. ४
कधिं चिमुकली साडी येई तिची नयनांपुढें,
कधि भरजरी शालू जो कीं तिला बहु आवडे,
कधि झळकते काश्मीरींची तनूवरि शालुही;
गगनिं चपळा तैसी बाला सदा चमके गृहीं. ५
रुणझुण कधीं गाती पायीं रवें मृदु पैंजण,
हितगुज करी गोटांपाशीं कधीं मधिं कंकण:
श्रवणिं डुलती मुक्ता त्यांची कपोलिं छवी हले,
ध्रुव निकटिंच्या भूमिप्रांतीं उषाच जणूं खुले. ६
कधि ह्मणत ती दादा, दादा गळ्यांत पडे मम,
"लवकरि फुलें दे काढोनी ह्मणे, न निघे दम;
कधिं रुसुनियां केली माझी तिनें जरि 'फू' गडी
तरि पळभरें दावी प्रेमें मला नव बांगडी ! ७
कधिं कुशल ती रांगोळीतें निजांगणिं काढिते,
उडुंस नभिच्या चंद्रासूर्यां महीवरि आणिते:
सहज मधुरा संगीताचे कधीं लहरींसवें
जडहि पृथिवी ने स्वर्लोकीं सलील मनोजवें. ८
स्मरणिं मुरती वृत्ती साऱ्या नितान्त मनोलयें;
बिलगति जशीं हृद्देशाला भयें सकलेंद्रियें,
दडुनि बसली प्रौढावस्था मनोहर शैशवीं,
जणुं हिरकणी खाणीपोटीं, हिमालयिं जान्हवी. ९

मजविषयिंची माया मोठी कसा उतरे तिची
स्मृतिस असले देती नाना प्रसंग नवी रुची,
किती तरि खरें; खोटें कांहीं, जयांत कुणी तरी
चिडवुनि तिला मिथ्यालापें विनोद तिचा करी. १०
शुभ दिवशिं ज्या बंधुत्वाचा टिळा मज लावुनी,
मुदित हृदयें ओंवाळोनी प्रदीप्त निरंजनीं,
कमल भगिनी झाली माझी, मला दिन तो स्मरे
प्रथम, दिनिं ज्या उत्साहाचें नवें स्फुरण स्फुरे. ११

---

तृतीय प्रसंग.

## भाऊबीज.

रवि उगवला भाऊबीजे कडेवरि घेउनि,
सदनिं शिरतां मी त्या भावें जलार्घ्य समर्पुनी
मधुर दिसलें दृश्य प्रातःप्रभायुत सांवळें,
हृदयिं लहरी वात्सल्याच्या उचंबळवी बळें. १
अलक रुळती पृष्ठीं काळे मनोहर मोकळे,
शिरिं विरल ते न्हाली बाला प्रभाति तयामुळेः
तनुधवलता त्या केशांच्या बटांमधुनी दिसे
जलदपटलीं नानाकारीं जणों चपला हंसे. २
करित तुलसी पूजा बाला बसे विमलांगणीं,
गगन आपुल्या रूपा पाहे जया शुचि दर्पणीं;
धवल रचना रांगोळीच्या सभोंवतिं शोभती,
उडुगणिं गमे ये चंद्राची मनोरम कोर ती! ३

बिचकत उभा बालेमागें विनोदसुखांकित,
विलग करुनी दो बाजूंच्या बटांस सहस्मित,
अलक सगळे एका जागीं तयांमधिं गोंवुनी
न कळत दिला मीं पाचेचा तुरा वरि ठेवुनी ! ४
सुबक हिरव्या त्या पाचेच्या सुवासिक कोंदणीं
'बसवुं' ह्मटलें 'गंधें याला रुचेल असा मणी.'
कुसुम दिसलें शेजारींच्या गुलाब तरूवरी
नव विकसलें, त्यानें केली सुशोभित मंजिरी. ५
नवल ! कळल्या या मल्लीला न कीं कमलेप्रती !
अचलचि बसे, ईशध्यानीं तिची रमली मती !
मम करयुगें जेव्हां टाळी अकल्पित वाजली
दचकुनि वळे मागें, मातें विलोकुनि लाजली. ६
सकल कळण्या चेष्टा माझ्या विलंब न लागला;
अलकरचना ती मर्दानी रुचे न मुलीं तिला;
विसकळवुनी वेणी, केशां पुनःकरि मोकळे
कुसकरुनि तों बालाहस्तें गुलाब गळे, मळे. ७
उचलुनि तया प्रेमें बाला हळू पदरा पुशी,
परि न हंसरी झाली त्याची मुखच्छवि फारशी.
वदन वळतां 'ये कोठोनी प्रसून' तिला कळे,
अकुसुम तरू पाही तेव्हां रडें तिस कोसळे. ८
क्षणि समजलें 'कोणीं केली अशी तरुची दशा;'
खवळलि जशी विद्युत्स्पर्शें घनागमनीं निशा;
अधर रदनें चावी त्याची थरारत रक्तिमा
पसरत चढे वेगें गाळीं अशोकसुमोपमा ! ९

खचुनि भरतां नेत्रां झाली तिची * गति कुंठित,
उसळुनि निघे कीं ‘ कोणाला करूं स्वपदांकित; ’
धगधगत ती घे विश्रांती हतोत्सव मन्मुखीं !
दुखवि न मला शब्दें एका, निघे सहसा सखी ! १०
सहवति न तीं अग्निज्वालाकटाक्षविलोकितें;
कटुतर तिचें भेदी मर्मा सहेतुक मौन तें;
अति कटुवचें ती लाखोली जरी मज वाहती
तरि न इतुकी होती माझी सखेद मनःस्थिती ! ११
उचित ठरलें मूर्खांसाठीं जगीं तनुताडन,
ह्मणति ‘ चतुरा मार्गीं आणी कटूक्तिरसायन; ’
विफल परि ते होती प्रेमी जनांमधि दंड, कीं
विधि ढकलि त्यां या मौनाच्या महोज्ज्वल पावकीं ! १२
हळु हळु निघें या ‘ तोंडी ’ चीं ‘ गडी ’ जमवावया
ह्मणत “ मजशीं होसी ताई, अकारण निर्दया. ”
सरलहृदया बाला साधी, लहान तिचें वय,
अनुभव तिच्या मायेचाही ह्मणे मम हो जय. १३
परि वळवि ती दृष्टी मातें दुरूनचि पाहुनी
सदनिं शिरली भ्रूसंकोचें मला झिडकारुनी.
हृदयिं भिनली बालेची ती अतर्क्य कठोरता,
तिजसह मना वैराग्यें ये अतीव विषण्णता. १४
निमिषचि मिळे वैराग्याला अशा स्थळ मन्मनीं,
रुचि अधिक त्या, त्या वेळींही तिच्या गुणचिंतनीं:

---

* रक्तिमेची.

अजुनिहि न त्या वाटे द्यावें तिला तिळ दूषण:
अवगुण न हा त्या बालेचा ह्मणें, 'मम दुर्गुण !' १५
" अहह ! कमलाप्रेमासंगें पदच्युत जाहलें
तिस रिझविण्या जें मीं वेणीमधीं सुम गुंफिलें !
समज न तिचा झाला कांहीं तरी भलताच कीं !
वसति दिसली हा ! नागाची तिला मम केतकीं !" १६
करित बसलों होतों ऐसे विचार परोपरी;
मन भरकटे, कोणीही त्या न येउनि आंवरी.
तरुतळवटीं काळाचीही गती न कळे मला,
अवचितचि तों 'दादा, दादा,' असा स्वर ऐकिला. १७
श्रवणिं शिरुनी अंतर्यामीं स्फुरे स्वर गद्गद
उसळत तळांतूनी जैसे जलाशयिं बुद्बुद !
वदन सुकलें ताईचें तें मला नच पाहवे,
कितिहि पुशिले येती अश्रू तरीहि नवे नवे. १८
पुशित पदरा अश्रू एका करें नयनांतले
जवळ दुसऱ्या हस्तें तीतें सकौतुक घेतलें;
धरि मम पदें एकाएकीं तिथूनि सुटोनियां
ह्मणत "कर तूं दादा, मातें क्षमा, करुनी दया." १९
उठवुनि तिला "वेडी वेडी" ह्मणोनि हसोनियां
शम वितरण्या केल्या गोष्टी सुयोग्य तया वया.
कमल शरमे पाहोनी ती मदीय उदारता;
परि पटल तें घे लज्जेचें हळूहळु जीर्णता ! २०
वदवुनि बळें घेई माझ्या मुखें कमला 'क्षमा;'
विमल विलसे स्नेहस्नानें तिचा मुखचंद्रमा;

अलक कुरळे सारीं मागें, बसे मज संनिधी,
मधुर वदली वाणी मातें विलोकित शुद्धधी. २१
"प्रिय मज किती आहे माझा गुलाब तुला श्रुत,
सकुतुक दिला हा तातांनीं सुखस्मृतिसंयुत;
कर फिरवुनी प्रेमें पाठीवरी, मज चुंबिलें,
शुभ मधुरशा आशीर्वादें सुखश्रवणां दिलें. २२
'जप तरुस या प्राणांपेक्षां, तदीय मुलां-फुलां,
सदनिं कविची नांदे वाटो उदार शकुंतला;
हृदय तनये, याच्या पुष्पापरी विकसो तव,
भुवनिं पसरो तत्प्रेमाचा सुगंध सदा नव.' २३
सकल घडला ठावा आहे तुला इतिहास हा;
कुसुम पहिलें पाहीं याचें किती कुतुकें अहा !
मृदुल कलिका, प्रेमोद्रेकें तिला कुरवाळिलें,
धरुनि हृदयीं, आनंदाश्रू तरूवरि ढाळिले. २४
तरुस कलिका दे ओजस्वी यदीयचि उष्णता
वितरि कलिके पुष्पावस्था मुखें मृदु चुंबितां,
प्रथम सुम हें त्या भानूच्या पदांवरि वाहिलें,
'विहरत तरुस्कंधीं राहो,' मनीं, नच राहिलें ! २५
हसुनि ह्मटलें, "ठावा मातें न हेतु तुझा सये,
श्रुतहि असतां, कोपावें कां तुवां ममताशये;
प्रभुचरणिंच्या निर्माल्याचें शिरावरि धारण
नवल ! करि कीं कष्टी ताई, तुला सजलेक्षण !" २६
तिस न पटली कोटी माझी, वदे करुण स्वरें
"उचित समयीं होतां गोष्टी न हो मन बावरें;

कुसुम सुकतें देतां देतां सुगंध मरीचिला,
न मम नयनीं येतें पाणी, शिरीं धरितें फुला." २७
वदुनि कमला मोठ्या कष्टें असें, मित थांबली;
विविध उठल्या कारुण्याच्या छटा मुखमंडलीं;
नयनिं झळके पाणी, प्रेमा द्रवोन्मुख जाहला,
पदर भिजला, त्या प्रेमाच्या जलामधिं नाहला. २८
स्फुरण हृदयीं होई, त्याच्या गतीसह नाचत
मृदुल कमलावाणी आली पुनः स्फुटतेप्रत,
"अनुभव कधी स्त्रीजातीची मला लघुता खरी;
पुरुषमनिच्या औदार्याची स्त्रियांस न ये सरी ! २९
अलकिं रुळलें, खालीं आलें, करें गळुनी मम,
'ममचि तरुचें' येतां ध्यानीं, 'तुवां खुडिलें सुम,'
प्रबळ उसळे विद्युद्वेगें मनीं अनुदारता;
अपरिचितही नाचूं लागे यथेच्छ, न लाजतां. ३०
'हृदय न कसें या दादाचें ढळे सुममार्दवें !
मृदु कठिण हा कार्याकार्यीं विवेक न या शिवे !
पुरुष सगळे त्या दैत्यांचे गमे अवतार हे;
उपकृति नको यांची वाटे, न तन्ममता सहे !' ३१
मतिस पटली ही तर्काची विलक्षण पद्धती,
विकृत करुनी दावी मातें अनेक तुझ्या कृती;
हितकर कधीं मत्कर्तव्यें तुवां समजाविलीं
प्रकृत समयीं 'ती दादाची अहंकृति' भावली. ३२
परि उघडलीं द्वारें सारीं तुझ्या हृदयांतलीं,
करिं धरुनि ही तर्कज्योति स्थळें बहु धुंडिलीं,

नव हुडकण्या धागे दोरे फिरें स्मृतिसंग्रहीं
तरिहि न कुठें स्वार्थाकांक्षा दिसे तव लेशही. ३३
विनय कमलाकष्टें कष्टी, सुखी कमलासुखें,
विनय कमलाहर्षें हर्षे, हसे कमलामुखें;
स्वयशिं न तसा उल्लासे तो, जसा कमलायशीं,
जरि न कमले आस्था त्याची, तिची विनया अशी ! ३४
हसुनि ह्मटलें मीं " नाहीं या विधानिं यथार्थता,
असलि तरिही व्हावें ताई, न तूं लव विस्मिता;
रसिकिं न रसा सौख्यापेक्षा, जशी रसिका रसीं;
भ्रमरिं मधुला नाहीं गोडी, मधूंत तया जशी. " ३५
निमिष करुनी बाला चित्तीं विचार, मला पुसे
" रसिकरसिं, या श्रेष्ठत्वाची कुणा पदवी असे ? "
" भजक लघु तो ईशापेक्षां " वदें, कमला ह्मणे,
" प्रथमचि, परी अंतीं होई स्वयें प्रभु सद्गुणें. " ३६
उगम सगळया सद्वृत्तींचा, उदात्तगुणाश्रय,
प्रभवति कुलें सद्धर्माचीं जयांतुनि निर्भय,
ठसलि हृदयौदार्याची त्या मनीं प्रतिमा–तव;
विलय विनयीं पावे माझें अहंकृतिगौरव. ३७
मज न कळतां वेणी माझी हळहळु बांधुनी
कुसुम रचुनी शोभा तीतें मनोहर आणुनी,
सकुतुक निरीक्षूनी मातें पहात पुनः पुन्हां
हसत विजयी मुद्रेनें तूं तदा असशील ना ! ३८
अहह ! मुकलें त्या प्रेमाच्या रसानुभवास मी;
अरसिकपणें केलें बंधो, तुला रसिका श्रमी !

विसर, विसर, स्नेहें दादा, त्वरें अपवाद हा,
तुज परिचयें ठावा माझा स्वभाव खरा पहा" ३९
फिरुनि चरणीं लागूं पाहे क्षमेस्तव बालिका,
परि न कमले लाभे माझी पुनः पदधूलिका;
तिजसि जननी हांका मारी स्वरें मृदु भोजना,
जइं मज बळें घे पंक्तीला, मिळे शम तन्मना. ४०
दिवस सगळा तो प्रेमाच्या कथांमधिं संपला,
गगनिं झळके तों बीजेची सुरेख शशीकला:
तिजसि धरुनी साक्षी, बंधू मला कमला करी,
ह्मणत, "ममता दादा वाढो तुझीहि हिच्या परी." ४१
द्रुपदतनया श्रीकृष्णाशीं करी भगिनीव्रत;
प्रभुविषयिंच्या तत्प्रेमाच्या जगास कथा श्रुत;
मजसि कमला माधुर्याची तया रुचि चाखवी.
विरहिं चढली प्रेमा गोडी प्रतिस्मरणीं नवी. ४२
नव सुखमयी नाना रीती तिची स्मृति जाहली;
विविध कुसुमें एका सूत्रामधीं परि ओंविलीं;
जगिं तुज जगत्सूत्रा प्रेमा, कुठोनि दुजी सरी !
सकलिं धरिसी अद्वैताची निरागस माधुरी. ! ४३

---

### चतुर्थ प्रसंग.

## मनोराज्य !

घणघण रवें येतां कानीं पथीं रथघंटिका
भिउनि लपली मेघाभासें मम स्मृतिचंद्रिका;

प्रकटलि पुनः ती बाल्याच्या पटांस झुगारुनी
क्षणिच रमणी पूर्णत्वानें विवाहित यौवनीं. १
मम मन करी आतां सद्यःक्षणा पथदर्शक,
चढत सुटली औत्सुक्याची कला अधिकाधिक;
जरि बहु जवें घेती धांवा पदें, तरि त्यांहुनी
त्वरित कमलागेहीं आलें पुढें मन धांवुनी. २
'सहजचि उभी राहे द्वारीं सखी, स्थित यौवनीं,
तंव तिजकडे प्रेमें वर्षाष्टकें अवलोकुनी,
तिजसि 'कमले,' या हांकेनें करीन सुविस्मित,
स्तिमित नयनें मातें हर्षें बघेन निरीक्षित. ३
लगबग किती आतिथ्यातें करील सखी मम,
मधुर वचनें, उत्साहाच्या भरें हरिल श्रम;
प्रथम पटली नाहीं माझी तिला जर ओळख,
अनुभविन मी-थट्टा भारी तिची करुनी-सुख ! ४
किति तरि मला प्रश्नांनीं ती करील पुरे पुरे;
कथिन सगळीं जेव्हां त्यांचीं यथोचित उत्तरें,
स्मरुनि सगळ्या झाल्या गेल्या वदेन कथा तिस,
शम वरिल तें तेव्हां कांहीं तिचें मन चौकस. ५
कधि धरिल ती गांभीर्यातें बळें तरुणोचित
बहुविध मला संसारींच्या खुब्या समजावित;
शिर हलवुनी प्रौढत्वाच्या कथांस, दुज्या पळीं
त्यजुनि परकी भावा होऊं शिशूपरि मोकळी. ६
रमवित तिला युद्धश्रींचे विलास निवेदुनी,
हंसवित कधीं बाळत्वींच्या सुखस्मृति देउनी,

सकरुण कधीं ढाळूं अश्रू गतां सुहृदांस्तव,
अशरण कधीं गांभीर्यानें करूं विधिचा स्तव ! ७
अभिनव कधीं साहित्याच्या कृति प्रतिभामय,
नृपनय कधीं, राष्ट्राकांक्षा, कधीं जनताजय,
जरठपतिच्या बाला पत्नी, कधीं विधवास्थिती,
कधि अभिरुची, स्त्रीशिक्षा वा स्वधर्मसमुन्नती, ८
रसिक गृहिणी, सच्छीलाची सुशिक्षित सुंदरी
विषय सगळे जे जे मानी महत्तम अंतरीं,
मनि धरुनि ते, तत्संबंधीं पुसेन तिचें मत,
ह्मणत, "कमले, घे तूं कांहीं स्वदेशहितव्रत." ९
पवनलहरी वाहे वेगें अनावर कल्पना
उठवि असले हृत्कासारीं तरंग पुनः पुन्हां;
भुवनविजयी प्रेमार्काची सदा सहचारिणी
हसवि रुसवी त्यांनां दीप्ति स्मृती गतहर्षिणी; १०
करिं धरुनि त्यां * उत्साहें ती सकौतुक नाचवी,
पसरलि तदा नानारंगी तरंगमुखीं छवी;
किरणिं हलतां मातुःश्रीचीं चकाकत कंकणें
शिशुमुखिं जशी खेळे दीप्ती तदीय छटागुणें. ११
प्रथम ठसुनी गेले ध्यानीं मनीं भगिनीगुण
करिति कमलालावण्याला सुखें स्वपदार्पण;
परिमल हरी चित्ता आधीं सुखोत्सवदायक
मग निपजवी दिव्यें रूपें मनीं सुम कौतुक. १२

---

* तरंगांनां.

जननसमयीं आयुष्याचें निरामय अंबर,
तयिं विलसते बाल्यावस्था उषोद्युति सुंदर,
मग उगवतो तारुण्याचा प्रभामय भास्कर
तनुकमलिनी तत्स्पर्शें हो प्रफुल्ल मनोहर. १३
परिणति अशी सौंदर्याची हळू हळु ये फला,
प्रतिदिनिं जशी चंद्राची ती चढूनि कलाकला;
स्मरुनि नियमा या सृष्टीच्या, तदाश्रय घेउनी
मधुर कमलालावण्याची छबी उठवीं मनीं. १४
परि न उठली ती एकाकी, तिच्या निकट स्थलीं
हळुच दुसऱ्या छायाचित्रें निजस्थिति रेखिली;
उदयगिरिच्या उच्चस्थानीं उषा रमणी डुले,
न कळत तिच्या स्कंधीं ठेवी रवी कर आपुले. १५
रसिक, तरुण, प्रेमी, विद्वान, सुशील तिचा पती;
तिस उचित तो भर्ता, भार्या तया अनुरूप ती;
हसतमुख तो सत्कारोनी मला स्वसखा गणी,
परिचय नवा, वाटे झाला जुनाच परि क्षणीं. १६
रसभरित ज्या गोष्टी, मौजा ल्हानपणांतल्या
निजविषयिंच्या सांगे प्रेमें, तयांसह आपुल्या,
श्रवण करि त्या उत्साहें तो हसूनि सकौतुक,
खिजवि रिझवी कांते प्रश्नें मधीं मधिं सूचक. १७
तंव शिशु कुणी क्रीडाशील त्वरें बहु धावत
ह्मणत कमले " आई, आई, " मिठी तिस घालित.
गुलगुल करी गोष्टी कानीं, रहस्यचि चाललें,
परि बिघडलें जेव्हां तेणें परा मज पाहिलें. १८

टकमक शिशू ओशाळोनी बघे, जननी तदा
वदत " तव हे मामा बाळा," ह्मणें " नमि तत्पदां; "
कर चिमुकले जोडी, प्रेमें तया हृदयीं धरीं !
परिचित सुखस्पर्शाची ती अहा नव माधुरी ! १९

---

पंचम प्रसंग.

## अपशकुन !

सुखगिरिशिरीं उत्साहानें चढे मम कल्पना,
विरमुनि तिथें दे विश्रांति क्षण श्रमल्या मना.
परि जंव तिनें उत्साहानें पुढें पद टाकिलें
चिरडुनि तिला सत्यें नेत्रीं निजांजन घातलें. १
'कठिन समयीं उद्यानींच्या शिळा बनती कडे,
मृदुल कुसुमस्पर्शें प्राणां तनु त्यजणें पडे !
हिमशकलही फोडी नौका प्रचंड सलील कीं !
सदय वसुधा माता जाळी मुलां सुखपावकीं.' २
मजसि पटली या गोष्टीची क्षणामधि सत्यता
मम मधुरशीं स्वप्नें सारीं मनांतचि राहतां !
थबकवि मला हर्षें जातां पुढें सदनांगणीं
करुण सुकलीं पर्णें ढाळी पदीं लतिका कुणी. ३
कुसुम नव्हतें त्या वेलीला, न पल्लवही मुळीं,
सुकुनि सगळी गेली होती तिची तनु कोंवळी;
जरि नववयस्का ती मुग्धा, अकालजरावशा;
हळहळ मना वाटे भारी तिची बघुनी दशा. ४

जननसमयीं आयुष्याचें निरामय अंबर,
तयिं विलसते बाल्यावस्था उषोद्युति सुंदर,
मग उगवतो तारुण्याचा प्रभामय भास्कर
तनुकमलिनी तत्स्पर्शे हो प्रफुल्ल मनोहर. १३
परिणति अशी सौंदर्याची हळू हळु ये फला,
प्रतिदिनिं जशी चंद्राची ती चढूनि कलाकला;
स्मरुनि नियमा या सृष्टीच्या, तदाश्रय घेउनी
मधुर कमलालावण्याची छबी उठवीं मनीं. १४
परि न उठली ती एकाकी, तिच्या निकट स्थलीं
हळुच दुसऱ्या छायाचित्रें निजस्थिति रेखिली;
उदयगिरिच्या उच्चस्थानीं उषा रमणी डुले,
न कळत तिच्या स्कंधीं ठेवी रवी कर आपुले. १५
रसिक, तरुण, प्रेमी, विद्वान, सुशील तिचा पती;
तिस उचित तो भर्ता, भार्या तया अनुरूप ती;
हसतमुख तो सत्कारोनी मला स्वसखा गणी,
परिचय नवा, वाटे झाला जुनाच परि क्षणीं. १६
रसभरित ज्या गोष्टी, मौजा ल्हानपणांतल्या
तिजविषयिंच्या सांगें प्रेमें, तयांसह आपुल्या,
श्रवण करि त्या उत्साहें तो हसूनि सकौतुक,
खिजवि रिझवी कांते प्रश्नें मधीं मधिं सूचक. १७
तंव शिशु कुणी क्रीडाशील त्वरें बहु धावत
ह्मणत कमले " आई, आई, " मिठी तिस घालित.
गुलगुल करी गोष्टी कानीं, रहस्यचि चाललें,
परि बिघडलें जेव्हां तेणें परा मज पाहिलें. १८

टकमक शिशू ओशाळोनी बघे, जननी तदा
वदत "तव हे मामा बाळा," ह्मणें "नमि तत्पदां;"
कर चिमुकले जोडी, प्रेमें तया हृदयीं धरीं !
परिचित सुखस्पर्शाची ती अहा नव माधुरी ! १९

---

पंचम प्रसंग.

## अपशकुन !

सुखगिरिशिरीं उत्साहानें चढे मम कल्पना,
विरमुनि तिथें दे विश्रांति क्षण श्रमल्या मना.
परि जंव तिनें उत्साहानें पुढें पद टाकिलें
चिरडुनि तिला सत्यें नेत्रीं निजांजन घातलें. १
'कठिन समयीं उद्यानींच्या शिळा बनती कडे,
मृदुल कुसुमस्पर्शें प्राणां तनु त्यजणें पडे !
हिमशकलही फोडी नौका प्रचंड सलील कीं !
सदय वसुधा माता जाळी मुलां सुखपावकीं.' २
मजसि पटली या गोष्टीची क्षणामधि सत्यता
मम मधुरशीं स्वप्नें सारीं मनांतचि राहतां !
थबकवि मला हर्षें जातां पुढें सदनांगणीं
करुण सुकलीं पर्णें ढाळी पदीं लतिका कुणी. ३
कुसुम नव्हतें त्या वेलीला, न पल्लवही मुळीं,
सुकुनि सगळी गेली होती तिची तनु कोंवळी;
जरि नववयस्का ती मुग्धा, अकालजरावशा;
हळहळ मना वाटे भारी तिची बघुनी दशा. ४

“असहज अशी आली कैसी स्थिती लतिके, तुला,”
ह्मणुनि बघतां आश्चर्यानें तिच्या मृतिहेतुला;
बिलगुनि असे ज्याच्या कंठीं तिची भुजमालिका
तरु जरठ तो झाला पाहें सुखाशन कीटकां ! ५
विषम लतिकावृक्षाचें हें अमंगल तोरण
हलत कमलागेहद्वारीं बघूनि कुलक्षण,
अपशकुन तो वाटे माझ्या सुसंस्कृतही मना,
क्षणिं किति तरी आल्या गेल्या अमंगल कल्पना. ६
तरिहि उसन्या उत्साहानें तयां झिडकारित
सदनिं शिरलों मोठ्या कष्टें पदें जड टाकित.
सहज धरिल्या झोंपाळ्याच्या कड्या सुटल्या करीं,
भरलि धडकी त्यांच्या शब्दांसवें हृदयांतरीं. ७
‘खळखळ’ तया शब्दें दासी गृहांतुनि धांवली,
मजसि बघतां भ्रूसंकोचा बळें लपवी भली !
बसवुनि कड्या झोंपाळ्याच्या, ‘बसा’ ह्मणुनी मला,
पुसुनि अमुच्या नामा कामा, धरी पथ आंतला. ८
नयन शिणले अंतर्द्वारीं सहेतुक गुंतले,
श्रवणिं समयीं यावे आले न शब्दहि आंतले,
ह्मणुनि बघतां कंटाळोनी, दिसे नव पुस्तक
नवकविगणें केलें ‘राष्ट्रप्रबोधन’ नामक. ९
करिं धरुनि तें पृष्ठें त्याचीं अहेतुक चाळितां
मधुनि घुटके माधुर्याचे रसान्वित सेवितां
खिळुनि बसलीं मन्मित्राच्या कृतीवरि लोचनें
रडवि कविता त्याची साधी मला ऋणमोचनें. १०

———

१९९८

## षष्ठ प्रसंग.

# ऋणविमोचन.

नरमणि वसे पुण्यक्षेत्रीं प्रबुद्ध गुणाकर,
तनुमनधन प्रेमें वाही स्वभूमिपदांवर;
रमत जनताकल्याणाच्या अहर्निश चिंतनीं
व्रत ठसवि तें निःस्वार्थ्याचें उदाहरणें जनीं. १

समगुण सती त्याची; झालीं अनेक मुलें तयां;
उरलि विमला एकाकी ती परी पडत्या वया;
जनकजननीकार्यस्फूर्ती सुताहृदिं संचरे;
ह्मणति, 'अमुची आत्मज्योती बहिश्चर ही स्फुरे'. २

अमर अपुला आत्मा त्याच्या गतीस न बंधन,
हरि बल तिथें मर्यादेचें, अनंत–रसायन;
जड तनु परि ही सृष्टीची सुता, जननीसम
उचित समयीं घ्यावा लागे तिला पथिं विश्रम. ३

परहितरतां या सत्याची न हो स्मृतिही कधीं,
अजरचि जसे लोकांसाठीं बळें झटुनी सुधी
तनु झिजविती; स्वार्थत्यागा अशा जन वानिती.
मरणसमयीं येई कामा न ती जनतास्तुती. ४

स्वसुख बळि दे देशप्रेमा सदार गुणाकर.
गणिति न तनुस्वास्थ्या दोघें परार्थिं सदा भरः
क्वचितचि तयां निद्रा ठावी, न कार्य रुचे दुजें,
नवल न, तनुस्थानीं व्याधि श्रमातिशयें रुजे. ५

पळघटिदिनीं ती वाढोनी भयास्पद जाहली,
तिळहि न परी त्या दोघांनां तिची क्षिति वाटली,
जरि विनविलें वैद्यें घ्याया स्थलांतरिं विश्राम
तरिहि ढळला दांपत्याचा तया न दिनक्रम. ६
मरणशयनीं ऐशा रीती अकालिं अति श्रमें
जनक जननी येती दोन्ही जगद्धितसंभ्रमें;
विफल करि जी सेवा बाला अहर्निश जागुनी,
फुकट थकले मात्रा नाना भिषग्वर योजुनी. ७
समुचित, सती आधीं सोडी अहेवपणें मही;
ह्मणति जन कीं "सोनें झालें हिचें, कृतकृत्य ही !"
त्यजुनि तनुला आत्मा गेला, न निर्मम तो परी;
नयन खिळले जातां जातां तिचे विमलेवरी. ८
जनकनिकटीं येतां अश्रू सुता पदरा पुशी,
परि शयनिं ती ये एकांतीं तदा भिजवी उशी !
तिळहि न उरे आरोग्याची मुखावरि चारुता,
भिववि विमले आतां मृत्युस्वसा असहायता. ९
त्यजुनि विरहीं जातां स्वर्गा प्रिया सहधर्मिणी
दयित दयितानिष्ठ प्रेमी सुखें न जगे कुणी;
हृदय उसळे जाया जेथें वसे हृदयेश्वरी,
तनुहि गुरुता*मध्यप्रेमें तयाच पथा धरी ! १०
झिजुनि उरलीं काष्ठें देहीं प्रियामृति वीज ही
प्रखर पडतां पेटाया त्यां पुरे क्षण कालही;

* गुरुत्वाकर्षणाचा मध्यबिंदु.

जल न विमलावात्सल्याचें तया विझण्या पुरे;
धुमसत जळे, केलें त्याला न विघ्न गुणाकरें. ११
क्षण जवळ ये तो अंताचा भयानक शेवटीं,
कटुतम तसें वैराग्याच्या भरे 'विमलाकुटी.'
ह्मणत मरणा 'ये ये' धैर्यें गुणाकर तोंड दे.
"प्रगतिपथिं हा पेटे माझ्या दिवा नव" तो वदे. १२
विनत वदनें दुःखी बाला उशाजवळी बसे,
जवळचि तिच्या झारी गंगाजलें भरली दिसे !
कितिक जमले आप्त स्नेही हतोत्सव त्या स्थलीं
सकरुण पडे गांभीर्याची गृहावरि सावली. १३
तंव तिकडुनी हातीं यष्टी हळूहळु टेंकित
कुणि जरठ ये, येतां येतां मधींमधिं खोकत.
सकल वळले डोळे त्याच्या नवागमनाकडे;
'धनपति समाचारा आले धनंजय वांकडे.' १४
चलबिचल हो त्या पाहोनी गुणाकर मानसीं,
स्ववश करि ती देहा साऱ्या शिरूनि नसीं नसीं;
कर थरथरां कांपे त्याचा सुता करिं निर्बल
वचन वदतां कन्याकर्णीं स्वरें मृदु वत्सल. १५
"घुटमळतसे जातां जातां जगांतुनि जीव हा,
तुजविण जरी वत्से, त्याला दुजी नुरली स्पृहा;
मरणसमयीं होती माझे विचार हिरण्मय,
ऋण न फिटलें या श्रेष्ठींचें सुवर्णशतत्रयः १६
हृदयमृदुता जैसी ठावी तुझी, न तशी धृती,
( मम अनुभवा येती, येतां प्रसंगचि संप्रती )

विदित 'कुलजां ब्रह्मस्वाचा न ताप कधीं सहे,'
ह्मणुनि कथिलें आधीं बाळे, तुला न रहस्य हें. १७
श्रवण कर ही घोळे माझ्या मनामधि योजना
ऋण हरिल जी, ठेवी बाळे, तुला जरी निर्धना;
स्मरसि लिहिला ग्रंथ 'प्राचीप्रभा' बुधसंमत ?'
त्रिशत कुणिही द्यावी त्याची हिरण्मय किंमत. १८
कृति मम नवी विद्वानां ही रुचे जरि भारतीं,
मिळवि नकळे पाश्चात्यांच्या किती यश पंडितीं,
ह्मणुनि विजया पातालस्था तुझ्या सुहृदाकडे
करलिखित तें धाडीं, "त्यां," तो लिही "बहु आवडे."१९
ह्मणुनि इतुकें कन्यास्कंधीं श्रमें शिर टेंकिलें,
कर बिलगले कंठीं, कष्टें तिचें मुख चुंबिलें;
स्थल मधुरशा आनंदाचें न सौख्य अखेरचें
तरि न दुसरा वेड्या माये प्रसंग असा रुचे. २०
जनकशिर घे अंकीं बाला पुनः जपुनी करें.
स्थिर मन करूं लागे कष्टें अनाश्रित घाबरें,
तिस खुणवितो तों एकांतीं धनंजय यावया;
क्षणि पितृमतें वृद्धापाशीं उभी विमला तया. २१
जरठ वदला "आश्चर्यानें तुझें मुखमंडल
डवडवुनि ये रोमाचांनीं, मिळे तयिं दृग्जल;
श्रुत ऋणकथा ही नाहींशी दिसे, कथितों तुला,
ऋणनिरसना जो सोपासा उपायहि चिंतिला. २२
तव पितृसखा होता कोणी सुविद्य गुणी भला
विजय ह्मणुनी विद्याप्रेमी तया सुत एकला;

व्यसन बघुनी तें विद्येचें पिता बहु कौतुकें
मृदु वयिंच त्या धाडी विद्यार्जनास अमेरिके. २३
जंव न पुरती विद्या झाली, पिता मृत जाहला,
तनय जनकें आप्तस्नेह्यां धनासह अर्पिला.
तिळहि विजया त्या मित्रांनीं उणें न पडूं दिलें,
पितृधनहि त्या विद्याभ्यासा पुरे इतुकें मिळे. २४
विजयहि गुणी उत्साहाचें तया करि सार्थक,
मिळवि पदव्या विद्यापीठीं नवोन्नतिदर्शक;
प्रगतिपथिं तों त्याच्या आलें अतर्कित संकट
प्रकट तइं हो त्वत्ताताचें मनोगत उत्कट. २५
कपटपटुता दासी ज्याची असा कुणि धोरणी
जनहितमिषें पेढी काढी नवी सहकारिणी;
भुलवुनि जनां वाक्पांडित्यें तदीय धना हरी;
गिळुनि सगळें, व्यापारातें अचानक आंवरी. २६
'मज फसविलें दुर्दैवानें' असें पसरी मिष,
परि बहुजनां ठावें त्याच्या कृतींतिल किल्बिष,
किति तरि गृहें या व्यापारें अधोगति पावती.
विजयधनही गेलें, आली तयासहि ती स्थिती. २७
जनिं कलियुगीं श्रद्धा नाहीं जुन्यावरि राहिली.
नव लुडबुडे जेथें तेथें, नवें मति मोहिली;
कनकहि जुनें यां चालेना, रुचे नव लोहही:
बनति नव या विद्येसंगें अतीच हठाग्रही ! २८
विजयधनही होतें आधीं सुरक्षित मत्करीं,
परि अवदशा घेरी त्याच्या पित्या शिरुनी घरीं.

खुलवि झुलवी त्या धूर्ताची तया मुखमाधुरी;
मति पद चुके, लक्ष्मीचेंही पडोनि तयावरी ! २९
कळवुं विजया ही दुर्वार्ता दिली न गुणाकरें,
मन खचविणें विद्यार्थ्याचें गमे न तया बरें;
धन पुरवि तो विद्याभ्यासा स्वकीय सुहृत्सुता;
ऋणहि करितो त्याच्यासाठीं निजार्जित संपतां. ३०
परिचित जगा सच्चारित्र्यें पिता विमले, तव.
जन 'धनद या व्हावा' बोले, 'प्रबंधहि तो नव,'
ह्मणुनि ऋण मी संतोषानें तयास समर्पिलें;
हरहर ! परी फेंडायाचें न त्या बळ राहिलें. ३१
जनक न तुझा, दारिद्र्याचा दिसे पुतळाच हा !
भरत घटिका आली याची पळें विपळें पहा !
उदधि तळ तो घे विद्यार्थी, प्रबंधहि त्यासवें !
'नरक' लिहिला याच्या भालीं कसा तुज सोसवे !" ३२
'नरक' कटु या शब्दें बाला थरारत राहिली,
विजयविषया दुर्वार्तेनें सकंपचि जाहली.
जरठ विमले वार्तापत्रीं समस्तहि जाणवी,
सविजय बुडे नौका कैसी प्रतीच्य महार्णवीं. ३३
हतबल तिच्या झाल्या वृत्ती, फिरे जड मस्तक,
'नरक' वचनें जागी तीतें करी यमहस्तक !
शरण न दिसे कोणी ! खाया उठे जग वाटलें !
कडकडुनि हो विद्युद्वृष्टी ! गमे नभ फाटलें ! ३४
"बघ कितिक हे स्नेही येथें उदारहि मानसीं"
जरठ सुचवी, "कां तूं त्यांचेंच साह्य न मागसी ?"

मसलत रुचे ती याञ्चेची न मानधनेस त्या.
दृढमति करी सच्छीलाचें महाव्रत सेवित्या ! ३५

'विमल,' 'विमले' हांका मारी पिता मरणोन्मुख,
करुणवचनें त्या बाजूला तिचें वळलें मुख;
गडबडुनि ती जाऊं लागे, तिला अडवी खल
"ऋण बुडविसी ?" बोले; झाला असह्य तिला छल ! ३६

क्षणिं थबकली; आल्या क्रोधा गिळी मिटुनी मुख;
अचुक करितो चारित्र्याची प्रसंगचि पारख !
शम धरुनि ती बोले "कांहीं उपाय दुजा कथा;
धन न जवळी द्याया आतां, छळा न मला वृथा." ३७

"उचित" ह्मणुनी कांहीं काळें सभोंवति पाहुनी
"करिशिल जसें सांगूं तैसें ?" पुसे खल हांसुनी.
"करिन सगळें सच्छीलाला कलंक न लावितां;
नरकिं न बुडो" बोले बाला "सुता असतां, पिता." ३८

" 'प्रिय जनक हा जातां स्वर्गीं, वरीन तुह्मांस मी,'
मज वचन दे, व्हावें वेडे, अकारण का श्रमी ?
करिं वचन या दे तूं, घे ही तुझी ऋणपत्रिका
त्वरित कर ती आनंदानें समर्पण पावका !" ३९

परिसुनि अशी त्या दुष्टाची भयंकर वासना
नव कठिणता ये संतापें तिच्या मृदुळा मना;
श्रवणिं शिरला तों ताताचा पुनः करुण स्वर
तिस मृदु करी, त्या वृद्धाच्या शिरे करिं तत्कर ! ४०

सप्तम प्रसंग.

# भेट.

अधिक न पुढें कारुण्याची कथा मज वाचवे,
'ममचरित हें केलें नामांतरें कवि माधवें'
दृढतर असा झाला माझ्या मनींतिल संशय,
मतिस पटला, घ्याया वाटे जरी हृदया भय ! १
तंव सदनिच्या एका भागांतुनी दुसरीकडे
मज कुणि दिसे. जातां नारी सुरेख, पदें जडें,
निमिषचि मला जातां जातां बघूनि विसंबली,
सजल नयनें गेली मागें पहात निज स्थलीं. २
धवल मळक्या वस्त्रें होती तिची तनु झांकली,
जरठ न वयें, चिंतेनें ती दिसे परि वांकली !
कच विखुरले भालप्रांतीं यथासुख मोकळे
मन तरि तिचें होतें स्थानीं, न वा, नच तें कळे. ३
तिलक दिसला नाहीं भालीं, न लोचनिं काजळ,
गळिं गळसरी ? तीही नाहीं ! न वा मुख निर्मळ !
सकल विफलाशांचें वाटे पिशाच किं आग्रही
मृदु तनुंत त्या संचारोनी फिरे कमलागृहीं ! ४
जरि अमुक ही, ऐसी होई मनांत न निश्चिती
सुपरिचितशी वाटे मातें परंतु तदाकृती !
अति कृश परी चित्राऐसी तिची तनु नेटकी !
भ्रमहि पडला, 'निर्मांसाही दुजी कमलाच कीं !' ५

अहह ! न ठरे भ्रांती हा ! ती भयानक कल्पना,
नच बिघडल्या मेंदूची वा अवास्तव जल्पना !
त्यजुनि मजला जाती माझी जरी विलया स्मृती
तरि अढळ ती होती नेत्रांमधीं कमलाऽऽकृती ! ६
मनिं निमिषही तर्का जागा मिळे न वहावया,
कटु कठिन त्या सत्याठायीं नसे इतुकी दया;
अनुभव म्हणे ‘खोटें झालें तुझें अनुमान न;’
हृदयिं सललें जें बुद्धीचें करी अभिनंदन. ७
कुणि तरि गमे दुःखोद्गारें पडे धरणीवरी,
पळत दुसरें कोणी आलें तया क्षणिं सांवरी;
क्षणिच दुसऱ्या आली कानीं सखीसदनांतुनी
हलवि तनुला ती किंकाळी हृदंतर भेदुनी. ८
हुडहुडि भरे शीतें अंगीं तसें मज जाहलें,
तनु थरथरे अंतर्भागीं यदा पद टाकिलें;
उर धडधडे, ये अंधेरी भयें नयनांवरी,
जणुं अज बळी द्याया नेती गमे मखमंदिरीं. ९
सदनिं शिरुनी देखावा जो भयानक पाहिला,
स्मृतिपटिं असे स्पष्टत्वें तो चिरंतन रेखिला !
छवि अधिक ती हो सुव्यक्ता तिचें वय वाढतां,
मम नयनिंच्या अश्रुस्नानें स्फुरे स्मृतिची लता. १०
विगलित कृशांगी ती होती अचेतन भूवरी,
धरुनि पदरें वारा घाली तिला कुणि सुन्दरी
श्रवण हृदया लावी त्याची क्रिया समजावया,
मग जल मुखीं सिंची संज्ञा तिची स्थलिं यावया. ११

कवण युवती ही शुश्रूषा हिची करि आदरें,
ह्मणत कमले ' वन्सॆवन्सॆ ' हिला हलवी करें ?
ह्मणुनि बघतां, मन्मित्राची दिसे सहधर्मिणी,
जिवलग सखी जीवाहूनी जिला कमला गणी. १२
"अहह ! कमले ! बालत्वींच्या सखे, सहचारिणी,
किति कठिन ही गांजी तूतें दशा तरि वैरिणी !"
स्फुट मम अशा उद्गारांनीं स्वकार्यनिमग्न ती
वळवि वहिनी दृष्टी मागें; तिची चळली धृती ! १३
तंव तिकडुनी आला तेथें तिचा पति माधव
स्वकरिं कमलाहस्ता घेई चिकित्सकपुंगव.
वदनिं न दिसे आशा त्याच्या तिळाइतुकी मला,
जणुं ह्मणत तो 'धिक् धिक् माझ्या रसायनकौशला' ! १४
प्रथम कमलानेत्रीं घाली उगाळुनि अंजन.
ह्मणत "सुहृदा, बेभाना हें खरोखर भंजन !"
करित कमलेसंबंधींच्या प्रियेप्रति सूचना
ठरवि बघुनी ग्रंथीं कांहीं नवौषधयोजना. १५
कर धरुनि तो मातें नेई दुज्या मग दालनीं.
ह्मणत "विनया, कष्टी किंवा अधीर न हो मनीं"
मजसि कमलादुर्दैवाच्या कथा सगळ्या कथी
श्रुत सहृदयां त्या, तो 'राष्ट्रप्रबोधनिं' ज्या ग्रंथी. १६
हृदय उसळे दुःखावेगें तयास नियंत्रित
कितिक महिने होती ताई अशी क्षयपीडित;
अजि हृदयिचा गूढ ज्वालामुखी मम दर्शनें
प्रकटुनि जवें पेटे, भाना तिच्या विलयास ने. १७

शम हरपला, आनंदानें यमालय जोडिलें,
चपल गतिचे धांवोनी कीं मनोरथ मोडले !
अशुभचि खऱ्या, झाल्या खोट्या सुमंगल कल्पना !
विफल ठरल्या आर्यत्वाच्या मनोहर जल्पना ! १८
अति परिचयें भासे ज्यांचें महत्व न फारसें
नव अनुभवीं हर्षामर्षी महोत्कटता वसे;
प्रबळ जगिंच्या अन्यायाची अशी तइं चीड ये
बघुनि मम ती मुद्रा कांपे मदीय सुहृद् भयें ! १९
"नव कुसुम हें तोडायाला शठें कर टाकिला
तुटुनि पडला नाहीं कैसा तया क्षणिं भूमिला !
कमल—हृदया शब्दाग्नीचे जयें चरके दिले
परिणयिं कसें होमाग्नीनें न तें मुख जाळिलें ! २०
द्विजवरकरें धर्मे त्याच्या शिरावरि अक्षता
उधळुनि कशी या अन्याया दिली निज मान्यता !
द्विजवर न ते ! तीं अन्नार्थी तिथें जमलीं भुतें !
प्रलपन गमे सैतानाचें ! न धर्ममुखोक्त तें ! २१
जगहि मिरवूं देई त्याला सुशील गृहस्थसा !
मनुज तनुचा या अन्यायें न हो भडका कसा !
सकल जग हें स्वार्थी ! स्वार्थी ! परार्तिविरक्त हें !
बडबड वृथा धर्माची वा न संस्कृतिची सहे ! २२
अहह ! अथवा कां निंदावें जनां दुबळ्या वृथा
प्रभुकरिंचि तीं चित्रें, त्या हें रुचे जइं सर्वथा !
द्रुपदतनयालज्जा ज्यानें सभेमधिं रक्षिली
करुण कमलावाणी देवें तयाच उपेक्षिली !" २३

मम न टिकला हा संतापप्रभंजन फारसा,
स्थल निज दिलें रौद्रें भीमें मनीं करुणारसा;
कमल मुखिच्या "दादा, दादा," अशा मृदुल स्वरें
श्रवणिं पडल्या हांका, माझा प्रकोप तईं विरे. २४
त्वरित कमलेपाशीं राहीं उभा सुहृदासवें
मज तिजकडे, तीतें मातें न वा अवलोकवे !
भरुनि नयनिं आलें पाणी यथासुख वाहिलें
पुशित मज ती पाही, मीही तदा तिस पाहिलें. २५
वचन उमटे कांहीं केल्या तरी न मुखांतुनी;
किरण रविचा ये कोठोनी तमोमय दुर्दिनीं !
मज बघत ती शून्यें नेत्रें घडीभर राहिली
जइं मजशि हो दृष्टादृष्ट प्रबोधित जाहली ! २६
स्ववश करि ती क्षुब्धा चित्ता क्षणीं दृढ संयमें !
विकल मुखि त्या आली ग्लानि क्षणैक तया श्रमें;
करित कमलाताई किंचित् मृदु स्मित दुर्बल
फिरवि नयनें माझ्या देहावरूनि अचंचल. २६
समयिंहि अशा न्यूना भासे न ती तिळ कौतुकीं
जवळ बसवी क्षीणें हस्तें मला निज मंचकीं !
कुशल पुसुनी, अश्रुस्नानें करा मम न्हाणित
उगिच बसली, जाणें 'प्रश्नां मदीय अपेक्षित ! २८
परि सफल ती इच्छा होणें अशक्य विलोकुनी
प्रबल 'अपुल्या ऐसा माझा न संयम' जाणुनी
कमलचि वदे बाल्याऐसें करी मन मोकळें
अमृतसरिता वात्सल्याची मुखांतुनि ओघळे. २९

"किति तरि बरें वाटे बंधो, मला तुज पाहतां,
भय न मज दे आतां चिंता, न तद्भगिनी चिता !
तनु कुशल ही नौकाभंगें बुडूनिहि सागरीं
मजसि दिसली, धन्या दादा, तुझी भगिनी खरी. ३०

मजसि वहिनी सांगे साऱ्या तुझ्याविषयीं कथा !
मम सकलही गेल्या आतां लयास मनोव्यथा !
जग तुज ह्मणे 'मेला,' साहे न तें मम सौहृदा
उसळवि मनीं तें आशेच्या सकारण बुद्बुदां. ३१

ह्मणुनि सुहृदा, डोळे मार्गाकडे तव वेधले
मम तनुमधीं त्यांनीं प्राणां निरोधुनि ठेविलें;
अवचित फिटे दादा, त्यांचें चिरार्जित पारणें.
जगिं अनुभवा जें जें आलें भरोनि निघे उणें". ३२

सरकवित ती माझ्या अंकीं करी स्थित मस्तक
मम कटि करें वेढी, पाहे मुखीं जणुं अर्भक !
मुख न उघडूं देई मातें, तिला नव ये बल;
जळुनि सरतां तैल, ज्योती दिसे क्षण उज्ज्वल. ३३

"मज न उरलें आतां कांहीं प्रयोजन जीवनीं;
मरण मज ये—मी दैवाची—तवांकि सुखासनीं !
नमन तुज हें, येतें, दे दे निरोप मला जवें;
भरुनि नयनीं येती कां हीं तुझ्या नव आंसवें ? ३४

स्मृतिमय चलच्चित्रें नेत्रांपुढूनि ससंभ्रम
सरकत गतायुष्यप्रांतामधूनि पुढें मम

१९८८

विरुनि सगळीं जातां कालोदधीमधिं शेवटीं
भरुनि हृदतां आयुष्याची दिसे घडि एकटी ! ३५

सदय वहिनी, येतें आतां, सुहृद्वर माधवा,
स्मृति कधिमधीं होवो माझी तुह्मां करुणोद्भवा;
मरण सुख दे—येतें दादा,–तुवां मज पाहतां !
प्रभुस विनवीं, जन्मोजन्मीं मिळो तव बंधुता." ३६

श्रमलि, नयनां झांकी स्नेहें विलोकित मन्मुखीं
ह्मणत तुटक्या शब्दें "दादा" प्रसन्न मुखें सखी.
श्रवणि न पुनः-आलें माझ्या तिचें वचनामृत
नयनिं कमलानेत्रें केले विलास न सूनृत ! ३७

* * * *

उमलछि कळी, ती स्वच्छंदें विकास न पावली,
तंवचि पडली दुष्टात्म्याची तिच्यावरि सावली !
हृदयिं शिरला चिंतारोग प्रचंड तिला छळी
नवलचि न कीं ती या आधीं यमास पडे बळी ! ३८

* * * *

जरि न बघवे, तें अंकींचें निधान न सोडवे,
सुखद न जरी, त्या स्पर्शाचा न मोहहि तोडवे;
'*प्रकृति मरणें ही प्राण्यांची, विकारचि जीवन.'
श्रुत जरि मला, ग्वाही देई न त्या हळवें मन ! ३९

( समाप्त. )

---

* मरणं प्रकृतिः शरीरिणाम् । विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः । कालिदास.

REFBK-0001979
REFBK-0001979